प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

**संचार विभाग,** केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फॅक्स/Fax: 91 22 22660358

फेब्रुवारी 2, 2016

**‘R’ हे इनसेट असलेल्या रु.100 च्या नोटा आरबीआय प्रसृत करणार**

रिझर्व बँक लवकरच, तीन अतिरिक्त/सुधारित लक्षणे असलेल्या-म्हणजे, दोन्हीही अंक फलकांमध्ये **‘R’** हे इनसेट अक्षर, गव्हर्नर डॉ. रघुराम जी राजन ह्यांची सही व मागील बाजूवर ‘2015’ हे छपाईचे वर्ष छापलेल्या, महात्मा गांधी मालिका-2005 मधील रु.100 च्या बँक नोटा प्रसृत करणार आहे.

देण्यात येणा-या ह्या बँक नोटांचे डिझाईन, पूर्वी दिल्या गेलेल्या, महात्मा गांधी मालिका - 2005 मधील रु.100 च्या नोटांप्रमाणेच असेल. तथापि, ह्या नोटांमध्ये अंक फलकांमध्ये वाढत्या आकाराचे अंक, ब्लीड लाईन्स आणि नोटेच्या पुढील बाजूवर मोठे ओळख चिन्ह. वरील तिन्हीही लक्षणांनी युक्त (निराळेच इनसेट अक्षर असलेल्या) अशा रु.100 च्या नोटा, अलिकडेच प्रसारित करण्यात आल्या आहेत.

ब्लीड लाईन्स तसेच मोठे ओळख चिन्ह नसलेल्या, परंतु तेच इनसेट अक्षर (**‘R’**) व अंक फलकामध्ये वाढत्या आकाराचे अंक असलेल्या, रु.100 च्या नोटा, रिझर्व बँकेने आधी प्रसृत केल्या होत्या. आता देण्यात येणा-या बँक नोटांबरोबर, ह्या नोटाही एकाच वेळी प्रसारात राहतील.

रिझर्व बँकेने पूर्वी दिलेल्या रु.100 च्या नोटा ह्या, वैध चलन असणे सुरुच राहील.

**अजित प्रसाद**
सहाय्यक सल्लागार

**वृत्तपत्र निवेदन : 2015-2016/1814**